नाना काटे सोशल फाउंडेशनच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 21/07/२०25 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 161 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com



# ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर-2026’ स्पर्धा समन्वयाने यशस्वी करा - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : आगामी जानेवारीमध्ये ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६’च्या रूपाने देशात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकल स्पर्धेचे आयोजन होत असून स्पर्धेच्या यशस्वितेसाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि गतीने तयारीला लागावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. या स्पर्धेमुळे पुणे शहर व जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक पटलावर येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.**


‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’ स्पर्धेच्या अनुषंगाने आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महानगर पालिका आयुक्त नवल किशोर राम, क्रीडा युक्त शीतल तेली उगले, पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पिंपरी चिंचवड शहर सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, सायकल फेडरेशन ऑफ इंडियाचे (सीएफआय) महासचिव मनिंदर पाल सिंग आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार पुढे म्हणाले, या स्पर्धेसाठी आवश्यक रस्त्यांची दुरुस्ती, मार्गाची स्वच्छता, वैद्यकीय सुविधा आदी बाबींवर लक्ष द्यावे. स्पर्धेच्या आयोजनाबाबत प्रशासनाने वेळोवेळी आढावा घ्यावा. केलेल्या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी सादर करावी. त्यानुसार आवश्यक तेथे त्रुटींची दुरुस्ती करता येईल, असेही ते म्हणाले.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व सायकलपटू आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत सर्व ती तयारी करण्यात यावी. मार्गाची पाहणी करून आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात.

यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या स्पर्धेच्या अनुषंगाने शहरात रस्ते दुरुस्ती, खड्डे भरणे, स्पीड ब्रेकर बाबत आवश्यक कार्यवाही आदी कार्यवाही व्हावी असे सांगितले. शहरातील बहुतांश भागातून स्पर्धेचा मार्ग असल्याने वाहतूक वळविणे, बॅरीकेटिंग आदींच्या अनुषंगाने वेळेत माहिती दिल्यास सर्व पुर्वतयारी करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

जिल्हाधिकारी श्री. डूडी यांनी स्पर्धेच्या अनुषंगाने सादरीकरण केले. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या आयोजनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील पर्यटनाच्या क्षमता आंतरराष्ट्रीय पटलावर पोहोचणार आहेत. स्पर्धेसाठी युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल (युसीआय), स्वित्झर्लंडकडे मान्यतेचा प्रस्ताव पाठविला असून लवकरच मान्यता मिळेल. स्पर्धा युसीआय आणि सीएफआय यांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे. आगामी ऑलिम्पिक स्पर्धेची पात्रता स्पर्धा म्हणून ही स्पर्धा गणली जाणार आहे.



स्पर्धेच्या मार्गाचे शहरात पुणे व पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त, ग्रामीण भागात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी आणि विविध विभागांद्वारे संयुक्त पाहणी आणि मूल्यमापन करण्यात आले असून सीएफआयनेही रस्त्यांची संयुक्त पाहणी केली आहे. सीएफआयच्या समन्वयाने स्पर्धेचा प्राथमिक मार्ग निश्चित करण्यात आला असून त्यात चर्चेअंती काही बदल करण्यात येतील. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकल स्पर्धेच्या मानकांप्रमाणे रस्त्यासाठी तयारी करण्यात येईल.

पुणे शहर व पिंपरी चिंचवड, मावळ मुळशी पिंपरी चिंचवड, भोर,वेल्हे, मुळशी, पुणे शहर, पुरंदर आणि बारामती अशी चार टप्प्यात ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेची मोठी पूर्वप्रसिद्धी आणि स्पर्धेदरम्यानही २५ देशात थेट प्रक्षेपण व्हावे असा प्रयत्न आहे. पुणे जिल्ह्यातील पर्यटन संस्कृती आणि क्रीडा संस्कृतीला या स्पर्धेमुळे चालना मिळणार आहे, असेही ते म्हणाले.

सिंग म्हणाले, या स्पर्धेत सुमारे ५० देशांचे खेळाडू सहभागी व्हावेत असा प्रयत्न आहे. स्पर्धेसाठी भारतातील ४० खेळाडूंना संधी दिली जाणार असून त्यामध्ये महाराष्ट्रातील १० खेळाडूंचा समावेश असेल. जगात आंतरराष्ट्रीय सायकल दिन साजरा केला जातो.

मात्र भारतात राष्ट्रीय सायकल दिन नसल्याने या स्पर्धेच्या निमित्ताने स्पर्धेदरम्यानचा एक दिवस ‘राष्ट्रीय सायकल दिवस’ म्हणून घोषित केल्यास सायकलिंगला देशात चालना मिळेल, असेही ते म्हणाले.

ही सायकल स्पर्धा पाहून प्रेरणा मिळालेल्या नवोदित सायकलपटूंना सराव करता यावा यासाठी शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे वेलोड्रम उभारण्यासाठी ३५ कोटी रुपयांचा प्रस्ताव केला असल्याचे श्रीमती तेली उगले यांनी सांगितले. यावर या प्रस्तावाला तत्काळ निधी देण्यात येईल असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे पदाधिकारी, पुणे महानगरपालिका, आरोग्य विभाग आदींसह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# नाना काटे सोशल फाउंडेशनच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पक्षातर्फे २२ जुलै ते ३० जुलै दरम्यान वाढदिवस जनविश्वास सप्ताह साजरे करण्याचे ठरविले असुन त्या धोरणानुसार मा. विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड विधानसभा मतदार संघात विविध ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**




यावेळी जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे म्हणून नागरिकांना रक्तदान म्हणजे जीवन दान आहे.आपण रक्तदान करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी.अशा प्रकारचे आयोजकांकडून आवाहन करून रक्तदात्यांना रक्तदान करण्यासाठी विनंती करण्यात आली.

चिचवड मतदार संघात विविध ठिकाणी फलक लावून सोशल मिडीया व विविध समाज माध्यम मार्फत रक्तदात्यांना या शिबिराची माहिती देण्यात आली होती.

रक्तदान शिबिराची वेळ सकाळी १० ते दु ३ वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. यावेळी ८३७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.जनसेवा रक्तपेढी व संजीवनी रक्तपेढी या संस्थेमार्फत रक्त संकलन करण्यात आले.

यावेळी मा.विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांचे मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले.यावेळी कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ओबीसी सेल चे अध्यक्ष सतिशदादा दरेकर, मा. नगरसेवक खंडुशेठ कोकणे, संतोष कोकणे, विनोद नढे, नगरसेविका उषामाई काळे, दिलीप आप्पा काळे,कैलासबाबा बारणे, राजेद्र साळुखें,, प्रशांत सपकाळ, शाम जगताप, तानाजी जवळकर, शरद बारणे , विशाल पवार, गोरक्षनाथ पाषाणकर, विशाल बारणे , प्रमोद शिदे , भरत बारणे, महाराष्ट्र राज्य अनुसुचीत जाती जमाती आयोग सदस्य गोरक्ष लोखंडे, मा. जिल्हा परिषद सदस्य राजेद्र जगदाळे, चिचवड विधानसभा महिला अध्यक्षा संगीताताई कोकणे,उपाध्यक्षा अश्विनीताई चंद्रकांत तापकीर , पैलवान अजय कदम,गणेश नखाते, काळुराम कवितके, राजेद्र पवार, सुनिल गोडांबे, मोहनशेठ नखाते, माऊली जाधव, माऊली हांडे, माऊली काटे, पोपट जगताप, प्रमोद काटे, शंकर काटे, नंदकुमार काटे, विलास काटे, अनिल काटे, जगन्नाथ काटे, मच्छिंद्र काटे, तसेच मा.स्वीकृत सदस्य सागर कोकणे ,युवानेते उमेश काटे, चंद्रकांत तापकीर,सुमित डोळस यांनी शिबिराची जबाबदारी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले

# शहरात परतीच्या प्रवासातील वारकऱ्यांसाठी आरोग्यसेवा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर विठुरायाचे दर्शन घेऊन परतीच्या प्रवासाला निघालेल्या जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पालखीचे पिंपरी चिंचवड शहरात आगमन झाले. दरम्यान छत्रपती चॅरिटेबल फाउंडेशन अंतर्गत समर्थ भारत, सक्षम भारत अभियान वैद्यकीय विभाग आयोजित व अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या माध्यमातून वारकरी आरोग्यसेवा व चरण सेवेचे आयोजन करण्यात आले.




या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष याचे पुणे जिल्ह्याचे प्रमुख डॉ. मानसिंग साबळे व पुणे जिल्हा समन्वयक अमित जागडे यांनी उपस्थिती दर्शवली. त्याचप्रमाणे समर्थ भारत सक्षम भारत वैद्यकीय विभाग प्रमुख डॉ योगेश पिंगळे, औद्योगिक विभाग प्रमुख सौ दीपावली गायकवाड मॅडम, शिक्षण विभाग प्रमुख प्रा. हेमंत राजस्था सामाजिक कार्यकर्ते किशोर पाचपुते, शशिकांत नाकडे, डॉ वितराग संचेती, डॉ सुयोग पाखरे, डॉ. प्रणव पाटील, समर्थ भारत प्रमुख गौरव वाळुंजकर तसेच अनुलोम चे पिंपरी भाग जनसेवक श्री राजकुमार जाधव, भोसरी भाग जनसेवक पै. अक्षय गावडे व मिलिंद पाटील, श्रीधर मानकर, राजू चौधरी, नियती खराडे, यांसह 14 अनुलोम मित्र उपस्थित होते. त्याचप्रमाणे डॉ.डी.वाय. पाटील या संस्थेमधील संपूर्ण डॉक्टरांची टीम या ठिकाणी चरण सेवा साठी उपस्थित होती.

या ठिकाणी जवळपास सर्व वारकऱ्यांनी चरण सेवेचा लाभ घेतला.

# सायबर चोरट्यांकडून एक कोटी 11 लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणुकीचे सत्र कायम आहे. सायबर चोरट्यांनी गुंतवणुकीच्या आमिषाने एक कोटी ११ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध सायबर पोलीस ठाणे, तसेच कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोणी काळभोर भागातील एकाची शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ८८ लाख ३४ हजारांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत ४७ वर्षीय तक्रारदाराने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार लोणी काळभोर भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर फेब्रुवारी महिन्यात संदेश पाठविला होता. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते.रक्कम गुंतविल्यानंतर त्यांना सुरुवातीला परतावा देण्यात आला. त्यानंतर तक्रारदाराने चोरट्यांच्या बँक खात्यात वेळोवेळी रक्कम गुंतविली. रक्कम गुंतविल्यानंतर त्यांना परतावा देण्यात आला नाही, तसेच परतावाही देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलीस निरीक्षक निकम तपास करत आहेत.



# पत्रिका पाहण्याच्या बहाण्याने तरुणीचा विनयभंग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: भावाच्या जन्म पत्रिकेवर तोडगा सांगण्याच्या बहाण्याने एका ज्योतिषाने तरुणीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना सहकारनगर भागात घडली. आरोपी ज्योतिषीने वनस्पती देण्याची बतावणी करुन तरुणीला कार्यालयात बोलावले. त्याने कार्यालायत तरुणीचा विनयभंग केला. या प्रकरणी सहकारनगर



पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी ज्योतिषाला अटक करण्यात आली आहे. अखिलेश लक्ष्मण राजगुरू (वय ४५) असे अटक करण्यात आलेल्या ज्योतिषीचे नाव आहे.

त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र नरबळी, अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका २३ वर्षीय तरुणीने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पीडित तरुणीने तिच्या मोठ्या भावाची जन्मपत्रिका दाखवण्यासाठी आरोपी ज्योतिषीची भेट घेतली होती.

त्या वेळी राजगुरू याने पत्रिका पाहून भावाच्या आयुष्यातील अडचणी दूर करण्यासाठी एका विशेष वनस्पतीची आवश्यकता असल्याची बतावणी केली होती. शनिवारी (१९ जुलै) तरुणीला वनस्पती घेण्यासाठी कार्यालयात या, असा संदेश पाठवून बोलावून घेतले.

# पिंपरी मध्ये अज्ञात सशस्त्र दरोडा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी-चिंचवडमध्ये अज्ञात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकला आहे. उच्चभ्रू मानल्या जाणाऱ्या निगडी प्राधिकरण येथे हा दरोडा टाकण्यात आला आहे. पिस्तुलाचा धाक दाखवून हा दरोडा टाकण्यात आला आहे. सुदैवाने यात दरोडेखोरांनी कुणालाही जखमी केलं नाही.




रात्री नऊच्या सुमारास निगडी प्राधिकरण येथे अज्ञात पाच जणांच्या टोळीने दरोडा टाकला. बंगल्यातील केअर टेकर आणि त्याच्या कुटुंबाला पाठीमागे असलेल्या खोलीत तोंडाला आणि हात, पायाला सेलो टेपने बंद करून डांबून ठेवलं. बंगला मालकालादेखील पहिल्या मजल्यावरील रुमध्ये हात बांधून बंद केलं.घरातील दरोडेखोरांनी कपाट उचकटून घरातील सोने, चांदीचे दागिने असा साडेसहा लाख रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

बंगला मालकाने बाल्कनीत येऊन आरडाओरडा केल्याने दरोडा टाकल्याचे नागरिकांना समजलं. नागरिकांनी तातडीने पोलिसांना बोलावले. तोपर्यंत दरोडेखोर पसार झाले होते. सुदैवाने यात कुणीही जखमी नाही. पोलीस दरोडेखोरांचा शोध घेत आहेत.

# अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष आधार नोंदणी अभियान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात विशेष आधार कार्ड नोंदणी अभियान हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.




पिंपरी चिंचवड शहरातील माजी उपमहापौर हिरानंद उर्फ डब्बु आसवानी यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते या शहरात महाराष्ट्र राज्यातील विविध भागातून नागरिक वास्तव्य आहेत या सर्व नागरिकांसाठी आपले आधार कार्ड दुरुस्ती करणे तसेच नवीन आधार कार्डची नोंदणी करणे आधार अपडेट करणे, आधार व मोबाईल नंबर लिंक करणे यासाठी सदर उपक्रम राबविण्यात येत आहे.

शहरातील कित्येक स्थानिक नागरिकांना त्यांच्या दैनंदिन कामातून वेळ काढता येत नसल्याने व पुरेशी माहिती नसल्याने आधार दुरुस्ती प्रलंबित राहते, आजच्या धगधगीच्या जीवनात व बरेचदा अपूर्ण ज्ञानामुळे व आधार सेंटर कोठे आहे? त्याची वेळ काय असते? तसेच आधार सेंटरवर प्रचंड गर्दी असल्यामुळे व मर्यादितच आधार नोंदणी व दुरुस्ती होत असल्याने पिंपरी प्रभाग क्रमांक 21 व 19 मध्ये मंगळवार दिनांक 22 जुलै व 23 जुलै व शुक्रवार दिनांक 25 जुलै व 26 जुलै या दिवशी सकाळी 11 ते सहा या वेळेत हे विशेष आधार कार्ड नोंदणी अभियान आयोजित करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या विशेष अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी उपमहापौर हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांनी केले आहे.

तसेच या अभियानात सहभागी होण्यासाठी व या अभियानाबाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी दिलेल्या नंबर वर संपर्क साधावे 87 88 79 58 54 व 96 89 84 61 83 या नंबर वर संपर्क साधावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रहाटणीत भव्य रक्तदान शिबिर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रहाटणी परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.



रहाटणी परिसरातील राष्ट्रवादीपक्षाचे सागर कोकणे, सौ अश्विनी ताई तापकीर, सुमित डोळस व सागर कोकणे यांच्या वतीने सदर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.. या शिबिराचे उद्घाटन चिंचवड विधानसभा मतदार संघाचे नेते तथा माजी विरोधी पक्ष नेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक खंडू शेठ कोकणे ,माजी नगरसेवक सतीश दरेकर, माजी नगरसेवक राजेंद्र साळुंखे, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र जगदाळे, माजी नगरसेवक एडवोकेट गोरक्ष लोखंडे, चिंचवड विधानसभेच्या महिला अध्यक्ष संगीता कोकणे, भाजपचे नेते गणेश नखाते, सुनील गोडांबे मोहन शेठ नखाते , माऊली जाधव, रामदास काळभोर ,काळूराम कवितके, राजेंद्र पवार यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.